# ३. खेळ व शर्यती

## ३.१ मनोरंजनात्मक खेळ



पोत्यांची शर्यत



फुगा उडवत नेणे



फिरत्या दोरीवरून उड्या



लंगडीने बाद करणे



चेंडू शिवाशिवी

- वरील प्रमाणे विविध मनोरंजनाचे खेळ घ्यावेत. सर्व विद्यार्थी तासिकेत सक्रिय राहतील असे पहावे.
- विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मैदान, साहित्य व इतर बाबींकडे लक्ष द्यावे. दिव्यांग व आजारी विद्यार्थ्यांना झेपतील असेही खेळ करून घ्यावेत.

## ३.२ बैठे खेळ



बादलीत चेंडू टाकणे



शेपूट लावणे



कागदी कप मनोरे



चिमणी भुर्रर्र



वस्तू ओळखणे

## माझी कृती

खालील खेळ खेळून पहा.



लुडो



बुद्‌धिबळ



सापशिडी

- मैदानावर खेळण्याची परिस्थिती नसताना बैठ्या खेळांचे आयोजन करावे.
- बैठे खेळ घेताना सक्रियतेला अधिक महत्त्व द्यावे.

## ३.३ स्थानिक व पारंपरिक खेळ



झिम्मा



टिपरी




लेझीम

- परिसरातील स्थानिक व पारंपरिक खेळांचा सराव घ्यावा.
- सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यातून विविध खेळांची निर्मिती करावी.

## ३.४ विविध खेळ

### स्नायूंच्या दमदारपणाचे खेळ



सिंगल बारला लटकणे



दोराला पकडून झोका घेणे



पारंब्यांना लटकणे

### स्नायूंच्या ताकदीचे खेळ




चेंडू फेकणे



लंगडी

- वरील खेळांतून स्नायूंचा दमदारपणा व ताकद वाढीस मदत होते. खेळताना सुरक्षिततेला महत्त्व द्यावे.
- ठरावीक काळाने स्नायूंच्या दमदारपणाचे व ताकदीचे नवनवीन खेळ आपल्या उपस्थितीतच घ्यावे.
- विद्यार्थ्यांवर खेळातून सहजपणे व्यायामाचा संस्कार रुजवण्याचा प्रयत्न करावा.

## लवचीकपणा वाढवणारे खेळ



पाठीची कमान करणे



पाय ताणणे

## समन्वयाचे खेळ



पाठीमागे वळून चेंडू देणे/घेणे



चेंडू झेलणे किंवा फेकणे

- शरीराचा लवचीकपणा वाढेल असे साहित्यासह व साहित्याशिवाय खेळता येणारे समन्वयाचे विविध नवनवीन खेळ तयार करून त्यांचे वर्षभर नियोजन करावे.

## वेगाचे खेळ

### धावण्याची शर्यत



## तोलाचे खेळ



टी शरीरस्थिती (टी बॅलन्स)



डोक्यावर वही ठेवून चालणे

- वेगाचे खेळ घेताना मैदानावर अडथळा नाही याची खात्री करावी.
- मैदान व खेळण्याची जागा मोकळी व सुरक्षित आहे हे बघावे. तसेच तोलाचे खेळ घेताना तोल जाऊन पडण्याच्या स्थितीत काय सावधानता बाळगावी याची माहिती खेळ खेळण्यापूर्वी विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

## ३.५ विविध शर्यती



जलद चालणे शर्यत



बदकचाल शर्यत

## ३.६ लघु खेळ





चेंडू ढकलत नेणे

- गट विरुद्ध गट व एक विरुद्ध एक अशा विविध शर्यतींचे आयोजन करावे. प्रारंभ व अंतिमरेषा आधी निश्चित करावी.
- शर्यत होताना विद्यार्थी नियमभंग करणार नाहीत याकडे काटेकोर लक्ष द्यावे. विजेत्या खेळाडूंचे व गटांचे टाळ्या वाजवून व शब्दांनी अभिनंदन करावे. हरलेल्या खेळाडूंचे सुद्धा सहभागासाठी अभिनंदन करावे.
- विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांनासुद्धा खेळ व शर्यतीत त्यांच्या क्षमतेनुसार सहभागी करावे.

## माझ्या आवडीचे खेळ

- आवडलेल्या खेळातील साहित्यांची चित्रे काढावयास सांगावी.
  उदा. आवडता खेळ क्रिकेट, त्यासाठी साहित्य - बॅट, बॉल, स्टंप इत्यादी.

IUTPS6